लोकमत

मस्ट READ

# शासकीय लाभ मिळवायचे असतील तर वेळेत करा री-केवायसी; १० वर्षांतून एकदा बंधनकारक

## आरबीआय नागपूरचे प्रादेशिक संचालक सचिन शेंडे यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** सामान्य बँक खात्यांची (पुनः) री-केवायसी प्रक्रिया प्रत्येक १० वर्षांतून एकदा करणे बंधनकारक आहे. ही प्रक्रिया वेळेत न केल्यास विविध शासकीय योजनांचा लाभ खात्यात जमा होणे थांबू शकतो, अशी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेचे (आरबीआय) नागपूर येथील प्रादेशिक संचालक सचिन वाय. शेंडे यांनी दिली. ते बुधवारी आरबीआय येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी उपमहाव्यवस्थापक (एफआयडीडी) अंजना श्यामनाथ, सहायक महाव्यवस्थापक विनोथ कुमार, सहायक महाव्यवस्थापक पीयूष तेलरांधे, पीएसवी सुधाकर व महेश थूल उपस्थित होते.

देशभरातील बँका आर्थिक समावेशन (एफआय) योजनांचा पूर्ण लाभ मिळविण्यासाठी आणि लाभार्थ्यांच्या बँक खात्याची री-केवायसी करण्यासाठी १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान राष्ट्रव्यापी अभियान राबवीत आहे. या अभियानाअंतर्गत बँका ग्रामपंचायत स्तरावर शिबिरांचे आयोजन करीत आहेत. यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेनेही पुढाकार घेतला असल्याची माहिती शेंडे यांनी याप्रसंगी दिली.



पत्रपरिषदेत माहिती देताना भारतीय रिझर्व्ह बँकेचे (आरबीआय) नागपूर येथील प्रादेशिक संचालक सचिन वाय. शेंडे. यावेळी उपस्थित उपमहाव्यवस्थापक (एफआयडीडी) अंजना श्यामनाथ, सहायक महाव्यवस्थापक विनोथ कुमार, सहायक महाव्यवस्थापक पीयूष तेलरांधे, पीएसवी सुधाकर व महेश थुल.

या अभियानाचा उद्देश प्रधानमंत्री जनधन योजना (पीएमजेडीवाय), प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पीएमजेजेबीवाय), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (पीएमएसबीवाय) व अटल पेन्शन योजना (एपीवाय) यामध्ये नोंदणीस चालना देणे व खातेदारांना त्यांच्या बँक खात्यांमधून मिळणाऱ्या लाभांचा अखंडित लाभ मिळवून देणे हा आहे.

आपण स्वत: विदर्भातील ११ पैकी ९ जिल्ह्यांतील २० शिबिरांना उपस्थित राहून री-केवायसीचे महत्त्व व सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये नोंदणी यावर भर दिला असल्याची माहिती शेंडे यांनी दिली. येत्या काळात गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांतील दुर्गम भागांतील शिबिरांना भेट देऊन बँक ग्राहक, स्वयं सहायता गट, बिझनेस करस्पॉन्डंट्स, विद्यार्थी व बँक प्रतिनिधींशी संवाद साधणार असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर व अमरावती येथे मोबाइल एलईडी व्हॅन्स तैनात करण्यात आल्या असून त्याद्वारे दुर्गम भागांपर्यंत जनजागृती केली जात आहे.

## विदर्भात आतापर्यंत ५,९११ शिबिरे; २.७७ लाख खात्यांचे अपडेट पूर्ण

९ सप्टेंबरपर्यंत या राष्ट्रव्यापी अभियानांतर्गत २.१८ लाख शिबिरे आयोजित करण्यात आली असून १.९५ कोटी खात्यांची री-केवायसी प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहे. विदर्भ विभागात ५,९११ शिबिरे आयोजित करून २.७७ लाखांहून अधिक खाती अपडेट करण्यात आली आहेत.

आरबीआयच्या वतीने खातेदारांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी आपली री-केवायसी औपचारिकता लवकर पूर्ण करावी, ज्यामुळे बँकिंग सेवा व सामाजिक सुरक्षा लाभ अखंडितपणे उपलब्ध राहतील. आर्थिकदृष्ट्या सुरक्षित व सक्षम राष्ट्र उभारणीसाठी हे अभियान एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे शेंडे म्हणाले. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत, तसेच खातेदार आपल्या बँक शाखेत जाऊनही ही प्रक्रिया पूर्ण करू शकतात.